# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ : २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web : ropune.org.in


जा.क्र : तंशिविकापु/विवि/वि.तां.प्रश्न/२०१९/ 2239 दिनांक : 03 JUN 2019

**स्मरणपत्र**

**अतितात्काळ/कालमर्यादीत**

प्रति,
प्राचार्य /संचालक / संस्थापक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सर्व विना अनुदानित
पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक : १३४८८७**

विषय : राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील नियानुसार वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. सुनिल केदार (सावनेर), श्री. अमर काळे (आर्वी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), ॲड. यशोमती ठाकूर (तिवसा).

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/विवि/वि.ता.प्रश्न/२०१९/२१४३ दिनांक २९/०५/२०१९.
२. मा. कक्ष अधिकारी महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्र. १०३२/तांशि-४, दिनांक २२/०५/२०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन, १. संस्थेत सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी निवड करताना नियमानुसार पुर्ण पगार न मागण्याचे किंवा त्याबाबत कुठेही तक्रार न करण्याचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येत आहे का? २. संस्थेकडून वेतन बुडवले जात आहे का? ३. वेतनाबाबत महाविद्यालयात प्राध्यापकांची काही तक्रार आहे का? ४. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? याबाबत विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे व या संदर्भातिल माहिती या कार्यालयास दिनांक ३१/०५/२०१९ पर्यंत कळविणेबाबत आपणास या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र.१ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

परंतू अद्याप बऱ्याच संस्थांची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. सदरची माहिती **उद्या दिनांक ०४/०६/२०१९ रोजी "अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे" येथे होणाऱ्या महाडीबीटी प्रशिक्षणासाठी येताना सोबत घेऊन यावी व हस्तदेय सादर करावी.** ज्या संस्था सदरची माहिती कळविणार नाहीत अशा संस्थांच्या वेतनाबाबतच्या भविष्यात उदभवणाऱ्या तक्रारींसाठी सर्वस्वी संस्था जबाबदार रहातील याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

3/6/19

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

Scanned by CamScanner